# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- महामार्गावरील अपघातग्रस्तांसाठी केंद्र सरकारची रोखरहित उपचार योजना
- महापालिकांसाठीचं मतदान आठवडाभरावर–विविध पक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध
- अंबरनाथ इथं काँग्रेसच्या निलंबित १२ नगरसेवकांचा भाजप प्रवेश–काँग्रेसची टीका
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात येत्या रविवारी पहिला केंद्रीय लोककला महोत्सव

आणि

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी व्ही सिंधूचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

****

महामार्गावरील अपघातग्रस्तांसाठी रोखरहित उपचार योजना केंद्र सरकार राबवणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सर्व राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशांचे परिवहन मंत्री आणि परिवहन विकास परिषदेच्या बैठकीनंतर ते बोलत होते. पंतप्रधानांच्या हस्ते लवकरच या योजनेला प्रारंभ होणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. या योजनेसोबतच अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता २५ हजार रुपये बक्षीस दिलं जाणार असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट– केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी**

****

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. या वर्षी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये घरांची गणना करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्येची गणना होईल. मोबाइल ॲपद्वारे केली जाणारी ही देशातील पहिली जनगणना असेल.

****

निवडणूक आयोगाने देशात बिहारसह इतर अनेक राज्यांमध्ये हाती घेतलेल्या मतदार याद्या विशेष पुनरीक्षण फेर-पडताळणी  कार्यक्रमाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात येत्या मंगळवारी अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. सुनावणीची प्रक्रिया १३ जानेवारी रोजी पुन्हा सुरु होईल, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं म्हटलं आहे.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांमधे येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून त्या पार्श्वभूमीवर संबंधित क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली आहे. हा आदेश महानगरपालिका क्षेत्रांतली केंद्रशासनाची कार्यालयं, निमशासकीय कार्यालयं, सार्वजनिक उपक्रम, बँका आणि तत्सम आस्थापनांमधेही लागू राहील, असं अधिसूचनेत नमूद केलं आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मतदानासाठी मतदार ओळखपत्रासह १२ पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने ही माहिती देण्यात आली. यामध्ये  पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन चालवण्याचा परवाना, आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र, राष्ट्रीयकृत बँका अथवा टपाल खात्याची खातेदाराची छायाचित्रासह असलेली खातेपुस्तिका,सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहीत अपंगत्वाचा दाखला,राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील फोटो असलेले ओळखपत्र,आदी कागदपत्रांचा या पुराव्यांमध्ये समावेश आहे.

****

अंबरनाथ नगरपालिकेतल्या काँग्रेसच्या नवनिर्वाचित प्रदीप पाटील यांच्यासह १२ नगरसेवकांनी काल भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपसोबत युती केल्यानं काँग्रेसनं या सर्वांना पक्षातून निलंबित केलं होतं.

या पक्षप्रवेश सोहळ्यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कडाडून टीका केली.ते काल जालना इथं प्रसारमाध्यमांशी बोलत होते.सदर प्रकार हा पूर्णपणे बेकायदेशीर असून,या सर्व १२ नगरसेवकांचं सदस्यत्व रद्द करण्यासाठी कायदेशीर कारवाई करणार असल्याचं काँग्रेसकडून सांगण्यात आलं आहे.

****

मुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं संवाद सभेला संबोधित केलं. चिकलठाणा परिसरात झालेल्या या कार्यक्रमाचं शहरातल्या अनेक प्रभागांमध्ये थेट प्रसारण करण्यात आलं.

अहिल्यानगर इथंही फडणवीस यांनी प्रचारसभेला संबोधित केलं. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा आदर्श मानून आपणही राज्य कारभार सुसज्ज करणार असल्याचं त्यांनी यावेळी आश्वस्त केलं.

****

राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. अनेक नेत्यांचे झंझावाती दौरे सुरु असून, जाहीरनामे प्रसिद्ध होत आहेत.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने काल जाहीरनामा प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा मुंबईच्या जनतेच्या वेदना, संघर्ष आणि आकांक्षांचा जाहीरनामा असल्याचं वंचित बहुजन आघाडीने म्हटलं आहे.

भाजपने काल नवी मुंबई महानगरपालिकेसाठी, तसंच 'कुंभ पर्वातली अमृत वचन' या नावाने नाशिक महापालिकेसाठीचा जाहीरनामा काल प्रसिद्ध केला. वंचित बहुजन आघाडी तसंच काँग्रेसने काल छत्रपती संभाजीनगरसाठीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. दररोज पाणी, प्रत्येक प्रभागात समाज मंदिर, आणि खाम तसंच सुखना नद्यांचा श्वास मोकळा करण्याचं आश्वासन काँग्रेसने या जाहीरनाम्यातून दिलं आहे.

****

मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ते योजनेचं संचालन जलदगतीने होण्यासाठी आता विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये 'सहअध्यक्ष' आणि 'पाच प्रगतशील शेतकऱ्यांचा' समावेश करण्यात येणार आहे. यासोबतच पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमध्ये सर्व 'विधानपरिषद सदस्यांना' देखील सदस्य म्हणून स्थान देण्यात आलं आहे. यासंदर्भातला शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

****

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा पहिला केंद्रीय लोककला महोत्सव येत्या ११ आणि १२ जानेवारीला होणार आहे. विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभुरे यांनी ही माहिती दिली. यात चार रंगमंचावर ११ कलाप्रकार सादर होणार असून, ३७७ कलावंत सहभागी होणार आहेत. या महोत्सवात चार जिल्ह्यातल्या संलग्नित महाविद्यालयांचे ६१ संघ, तर विद्यापीठ आणि उपपरिसराचा प्रत्येकी एक संघ असे एकूण ६३ संघ सहभागी होणार आहेत.

****

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधूने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिने जपानच्या तोमोको मियाजाकी हिचा २१-८,२१-१३ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा सामना जपानच्या अकाने यामागुची हिच्यासोबत होईल. या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत जाण्याची सिंधूची ही चौथी वेळ आहे.

****

केंद्र सरकारनं नुकतंच पारित केलेल्या विकसित भारत जी राम जी योजनेत ग्राम पंचायत शिवारातच नागरिकांना काम मिळत आहे. त्यामुळे या योजनेचा सर्वसामान्य नागरिकांना चांगला फायदा झाल्याची प्रतिक्रिया धाराशिव जिल्ह्यातल्या उपळे माकडाचे गावचे लाभार्थी श्रीकांत जोशी यांनी दिली. ते म्हणाले...

**बाईट – धाराशिव जिल्ह्यातल्या उपळे माकडाचे गावचे लाभार्थी श्रीकांत जोशी**

****

ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. गाडगीळ यांचं काल पुण्यात निधन झालं, ते ८३ वर्षांचे होते. आपल्या सहा दशकांपेक्षा जास्त कारकिर्दीत, गाडगीळ यांनी पर्यावरणाबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले. पश्चिम घाटातली जैव विविधता वाचवण्यासाठी त्यांनी मोलाचं योगदान दिलं.

****

धुळे सोलापूर महामार्गावर कन्नड घाटात भाविकांच्या गाडीला भीषण अपघात होऊन तीन जणांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. हे सर्वजण अहिल्यानगर

जिल्ह्यातल्या शेवगाव इथले रहिवासी होते, चालकांचं गाडीवरचं नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाल्याचं सांगितलं जात आहे.

****

रस्ते अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचं काटेकोर पालन करण्याचं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे यांनी केलं आहे. रस्ते सुरक्षा अभियानाच्या अनुषंगाने आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत बोलतांना काठोळे म्हणाले...

**बाईट – छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे**

काठोळे यांची ही सविस्तर मुलाखत आपण आज सकाळी आठ वाजून चाळीस मिनिटांनी आमच्या विशेष प्रासंगिक या सदरात ऐकू शकता.

****

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथं मतदान केंद्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा काल पार पडला. या प्रशिक्षण शिबीराला ८०० कर्मचारी अनुपस्थित होते. या सर्व ८०० कर्मचाऱ्यांवर गुन्हा नोंदवण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी जी श्रीकांत यांनी दिले आहेत.

****

गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व गर्भलिंगनिदान – पीसीपीएनडीटी कायद्यासंदर्भात धाराशिव जिल्ह्यात तालुकास्तरावर कार्यशाळा घेण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत काल धाराशिव इथं आठवी कार्यशाळा पार पडली. लिंग गुणोत्तराचं प्रमाण सुधारावं, तसंच समाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने या कार्यशाळांमधून मार्गदर्शन करण्यात आलं.

****